एकत्रित परिविक्षाधिन कार्यक्रम -९ (सीपीटीपी-९) अंतर्गत उमेदवारांच्या जिल्हा संलग्नता प्रशिक्षणाबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०२४/प्र.क्र. ३/उद्योग-३
मंत्रालय, मुंबई- ४००० ०३२
दिनांक: २० मार्च, २०२४

संदर्भ :-

१. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक टिआरएन-२०१३/प्र.क्र. ८४/१३/१२-अ, दि. २०/०१/२०१४.
२. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक टिआरएन-१११४/प्र.क्र. ८३/१४/१८-ब, दि. ०३/११/२०१४.
३. सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक : टिआरएन-०६२३/प्र.क्र.२६/सीपीटीपी,
४. दि. १८.०९.२०२३.
५. सामान्य प्रशासन विभाग कार्यालयीन आदेश : टिआरएन-२०२३/प्र.क्र.७१/सीपीटीपी-ब, दि.२५.०९.२०२३
६. यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे यांचे पत्र क्र.सीपीटीपी-९/तांत्रिक प्रशिक्षण/ २०२४/२१०, दि.०८.०३.२०२४
७. वनामती नागपूर यांचे पत्र क्र. आस्था ०३२४/सीपीटीपी-९/९८०/२०२४, दि.११.०३.२०२४
८. उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभागाचा शासन निर्णय क्र. इएसटी-२०२२/१६५/ प्र.क्र.६२/उद्योग-३, दि.०३.११.२०२२
९. उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग शासन आदेश क्र. टिआरएन-२०२३/प्र.क्र.१७४ /उद्योग-३, दि.२७.०९.२०२३
१०. उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग शासन आदेश क्र. टिआरएन-२०२२/७११ /प्र.क्र.१/उद्योग-३, दि.२७.०६.२०२२

शासन आदेश :-

सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राज्यसेवा परीक्षेव्दारे प्रतिवर्षी सरळसेवेने पदावर नियुक्त होणाऱ्या अधिकाऱ्यांचा एकत्रित परिविक्षाधिन प्रशिक्षण कार्यक्रम विहीत करण्यात आला आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र. ३ आणि ४ येथे नमूद कार्यालयीन आदेशान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-९ अंतर्गत उद्योग उपसंचालक (तांत्रिक), गट-अ या पदावर ०४ उमेदवारास आणि उद्योग अधिकारी (तांत्रिक), गट-ब या पदावर ०१ उमेदवारास परिविक्षाधिन अधिकारी म्हणून नियुक्ती दिली आहे. तसेच संदर्भ क्र. ५ व ६ च्या पत्राने जिल्हा संलग्नता प्रशिक्षण कालावधीसाठी सीपीटीपी-९ मधील अधिकाऱ्यांनी दि.२६.०३.२०२४ पासून जिल्हा संलग्नता प्रशिक्षणासाठी जिल्हा संलग्नतेसाठी रुजू होण्यासाठी विभाग स्तरावरुन आदेश निर्गमित करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. एकत्रित परिविक्षाधिन कार्यक्रमासंदर्भात संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयान्वये जिल्हा संलग्नता प्रशिक्षणासाठी नेमून द्यावयाच्या जिल्हयांसंबंधात मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

२. उपरोक्त पार्श्वभूमीवर एकत्रित परिविक्षाधिन प्रशिक्षण कार्यक्रम-९ अंतर्गत परिविक्षाधिन उद्योग उपसंचालक (तांत्रिक) गट-अ आणि एकत्रित परिविक्षाधिन प्रशिक्षण कार्यक्रम-८अ अंतर्गत उद्योग अधिकारी

(तांत्रिक), गट-ब या पदावर नामनिर्देशित उमेदवारास खाली नमूद तक्यातील रकाना क्र. ४ व ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे जिल्हा संलग्नता प्रशिक्षणासाठी महसूल विभाग व जिल्हा वाटप करण्यात येत आहे.

उद्योग उपसंचालक (तांत्रिक), गट-अ

अ.क्र.	प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्याचे नाव	मूळ जिल्हा	वाटप करावयाचा प्रस्तावित विभाग व जिल्हा	
			महसूल विभाग	कार्यालय व जिल्हा
१	२	३	४	५
१	श्री. निखिल सुरेश पाटील	सांगली	छत्रपती संभाजीनगर	जिल्हा उद्योग केंद्र, धाराशीव
२	श्री. आकाश नारायण बांगर	पुणे	नाशिक	जिल्हा उद्योग केंद्र, अहमदनगर
३	श्री. प्रविण विजय मोरे	धुळे	पुणे	जिल्हा उद्योग केंद्र, पुणे

उद्योग अधिकारी (तांत्रिक), गट-ब

अ.क्र.	प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्याचे नाव	मूळ जिल्हा	वाटप करावयाचा प्रस्तावित विभाग व जिल्हा	
			महसूल विभाग	कार्यालय व जिल्हा
१	२	३	४	५
१	श्रीमती. प्रियंका अनंत विद्यागर	सोलापूर	कोकण-२	उद्योग संचालनालय, मुंबई

३. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई यांनी उपरोक्त तक्त्यात नमूद अधिकाऱ्यांना सीपीटीपी-८अ व ९ या प्रशिक्षणाच्या खातेनिहाय जिल्हा संलग्नता या टप्यासाठी महसूल विभाग व जिल्हा वाटपानुसार निर्देशित कार्यालयात दि.२६.०३.२०२४ (म.पू.) रोजी रुजू करुन घेण्यात यावे. एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-९ मध्ये जिल्हा संलग्नता प्रशिक्षण टप्प्यातील प्रशिक्षणा संदर्भात विहित करण्यात आलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमानुसार उद्योग संचालनालय, मुंबई यांनी सदर अधिकाऱ्यांच्या खातेनिहाय जिल्हा संलग्नता प्रशिक्षणाच्या टप्यातील पुढील कार्यवाही करावी.

४. परिवीक्षाधीन अधिकारी यांचे प्रशिक्षण कालावधीतील मुल्यमापन करण्यासाठी शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.टिआरएन-२०१६/प्र.क्र.५८/सीपीटीपी, दि.०४/०१/२०१७ मधील निर्देशानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याची जबाबदारी विभागाचे नोडल अधिकारी तथा आस्थापना अधिकारी, उद्योग संचालनालय, मुंबई यांची राहील. त्यासाठी ज्या विभागीय कार्यालयाच्या कार्यकक्षेतील जिल्हा कार्यालयामध्ये प्रशिक्षणार्थी अधिकारी प्रशिक्षण घेत असतील त्या विभागाचे उद्योग सह संचालक यांनी संबंधित परिविक्षाधीन अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षण कालावधीतील मुल्यमापन अहवाल समन्वय अधिकारी म्हणून तयार करुन नोडल अधिकारी तथा आस्थापना अधिकारी, उद्योग संचालनालय, मुंबई यांना पुढील कार्यवाहीस्तव सादर करावा.

५. सदरहू परिविक्षाधीन अधिकाऱ्याने संदर्भ क्र. ३ येथील नियुक्ती आदेशातील अटी व शर्ती तसेच, खाली नमूद अटी व शर्तींच्या अधीन राहून प्रशिक्षण कालावधीमधील खातेनिहाय जिल्हा संलग्नता प्रशिक्षण पूर्ण करणे अनिवार्य आहे.

१) परिविक्षाधीन अधिकाऱ्याने संदर्भ क्र. ३ आणि ४ येथील सामान्य प्रशासन विभागाच्या नियुक्ती आदेशातील सर्व अटींची पुर्तता करणे अनिवार्य आहे.
२) सर्वसाधारणपणे राज्यसेवा गट-अ च्या अधिकाऱ्यांसाठी महाराष्ट्र शासनाने विहीत केलेले इतरही नियम या परिविक्षाधीन अधिकाऱ्यास लागू असतील व त्या नियमांचे पालन करणे त्यांना बंधनकारक राहील.

३) प्रशिक्षण कालावधीत परिविक्षाधीन अधिकारी यांनी त्यांची दैनंदिन रोजनिशी ठेवावी व ती अद्ययावत करावी.

४) ज्या महसुली विभागामध्ये परिविक्षाधीन अधिकारी कार्यरत आहे त्या उद्योग सहसंचालक, विभागीय कार्यालय यांनी परिविक्षाधीन अधिकाऱ्यावर प्रत्यक्ष नियंत्रण ठेवावे तसेच त्यांनी केलेल्या कामकाजाचे मुल्यमापन करावे. तसेच संबंधित प्रशिक्षणार्थी उमेदवारांचा प्रत्येक महिन्याचा प्रशिक्षण अहवाल प्रमाणीत करुन नोडल अधिकारी तथा आस्थापना अधिकारी, उद्योग संचालनालय, मुंबई यांना पुढील कार्यवाहीस्तव सादर करावा.

५) प्रशिक्षण कालावधीत परिविक्षाधीन अधिकाऱ्यांनी गैरवर्तन केल्याचे अथवा विहित प्रशिक्षण पुरेशा गांभीर्याने घेत नसल्याचे निदर्शनास आल्यास, त्याबाबतचा अहवाल त्वरीत सबंधित उद्योग सहसंचालक, विभागीय कार्यालय यांनी नोडल अधिकारी तथा आस्थापना अधिकारी यांचेकडे विनाविलंब पाठवावा. तसेच गैरवर्तनाची नोंद संबंधितांच्या वैयक्तीक सेवा अभिलेखात नोंदवाव्यात.

६) परिविक्षाधीन अधिकारी यांना प्रशिक्षणासाठी निश्चित करुन दिलेल्या जिल्हयात रुजू झाल्यानंतर त्याबाबतचा अनुपालन अहवाल परिविक्षाधिन अधिकारी यांनी संबंधित उद्योग सहसंचालक, विभागीय कार्यालय यांचेमार्फत नोडल अधिकारी तथा आस्थापना अधिकारी उद्योग संचालनालय, मुंबई यांचेकडे सादर करावा.

७) संदर्भ क्र. ५ येथील पत्रामध्ये नमूद केलेले अन्य अधिकारी श्री. सुशिल गरुड (सीपीटीपी-७) आणि श्री. अनमोल कोरे (सीपीटीपी-९) यांनी दि.२६.०३.२०२४ पासून त्यांना संदर्भ क्र. ९ आणि ८ अन्वये देण्यात आलेल्या जिल्हा संलग्नतेच्या ठिकाणी रुजू व्हावे.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०३२०१७०७३३१६१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHASHANK
TUKARAM CHAVAN

Digitally signed by SHASHANK TUKARAM CHAVAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY LABOUR AND MINING DEPARTMENT, 2.5.4.20=7dd1791f8c7f2d8cbabbae6c3c11ac3d4fe93ccab49daf36ff24dacd585e2276, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=A089DF063F1FFA9C6E2D052DB3C26C5B1ECE40048A4A7D39615BEE66D9E2053D, cn=SHASHANK TUKARAM CHAVAN
Date: 2024.03.20 17:17:20 +05'30'

(शशांक चव्हाण)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई

२) सर्व संबंधित उद्योग उपसंचालक (तांत्रिक), गट-अ आणि उद्योग अधिकारी (तांत्रिक), गट-ब संवर्गातील परिविक्षाधीन अधिकारी

प्रत :

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता /लेखापरीक्षा), मुंबई/नागपूर .
२. महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे.
३. संचालक, वसंतराव नाईक राज्य कृषी विस्ता व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, वनामती, बोले पेट्रोल पंप जवळ, अमरावती रोड, धरमपेठ, नागपूर- ४४२ ४१०.
४. उप सचिव (सीपीटीपी) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई .
५. उद्योग सह संचालक, विभागीय कार्यालय, पुणे/नाशिक/छ. संभाजीनगर .

६. महाव्यवस्थापक/व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, धाराशीव/अहमदनगर/पुणे.
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
८. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
९. निवडनस्ती (उद्योग-३).